महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५४

# महाराजा सयाजीराव आणि सत्यशोधक रामचंद्र धामणस्कर

## प्रा. सत्यनारायण आरडे




महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,

११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४

Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५४

# महाराजा सयाजीराव
# आणि
# सत्यशोधक रामचंद्र धामणस्कर

प्रा. सत्यनारायण आरडे

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव आणि
सत्यशोधक रामचंद्र धामणस्कर
इतिहास
प्रा. सत्यनारायण आरडे
●
प्रकाशन क्रमांक - ७४
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : प्रा. सत्यनारायण आरडे,
२०५/६, केदार रेसिडेन्सी,
पोखले रोड, कोडोली,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर-४१६११४.
मो. ९८८१७८९७०४
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २८ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# सत्यशोधक रामचंद्र धामणस्कर

महाराजा सयाजीरावांची बडोदा संस्थानातील ५८ वर्षांची प्रदीर्घ कारकीर्द अलौकिक, उज्वल व अखंड हिंदुस्थानाला दिशादर्शक होती. महाराजांच्या कारकीर्दीमध्ये (१९८१-१९३९) बडोदा संस्थानची प्रशासकीय यंत्रणा उत्तमरीत्या चालवण्यासाठी तज्ज्ञ दिवाणांची नियुक्ती महाराजांनी केली होती. १८७५ ते १९३९ अखेर बडोदा संस्थानात एकूण १४ दिवाणांनी यशस्वीपणे आपली कारकीर्द बजावली. महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सत्यशोधक चळवळीला राजाश्रय देतानाच सयाजीरावांनी अनेक सत्यशोधकांना बडोद्यात विविध महत्त्वाच्या पदांवर नियुक्त केले. २२ नोव्हेंबर १९०१ रोजी महाराजांनी बडोदा संस्थानचे ७ वे दिवाण म्हणून नियुक्त केलेले सत्यशोधक चळवळीतील प्रमुख कार्यकर्ते रामचंद्र विठोबा धामणस्कर हे यापैकीच होते. धामणस्कर यांनी २२ नोव्हेंबर १९०१ ते ३० जून १९०४ या काळात बडोद्याचे दिवाणपद समर्थपणे सांभाळले.

धामणस्करांना ‘भाऊसाहेब’ या नावानेही ओळखले जात होते. भाऊसाहेब म्हणजे एक उत्तम प्रशासक ज्यांना ब्रिटिश सरकारमध्ये कार्यरत असताना ‘मॅन ऑफ रुल्स’ हे ब्रिटिश वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेले विशेषण होय. भाऊसाहेब सत्यशोधक चळवळीचे एक महत्त्वाचे कार्यकर्ते होते. असे असतानादेखील इतिहासामध्ये कोठेही त्यांचा पुसटसा उल्लेख आढळत नाही. म्हणून त्यांची ओळख करून देण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.

## कौटुंबिक पार्श्वभूमी

धामणस्कर यांचे पूर्वीचे आडनाव जाधव असे होते. रत्नागिरी शहरापासून सहा कोसावर असणाऱ्या धामणसे गावामधील जाधव घराण्यामध्ये भाऊसाहेबांचा जन्म झाला. जाधव घराण्याकडे त्या गावचा खोती हक्क होता. पुढे यांचा खोती हक्क एका ब्राह्मणाच्या हाती गहाण पडला. तेव्हा घरी राहून आपला उदरनिर्वाह होणार नाही हे ओळखून भाऊसाहेबांचे पणजोबा पांडोबाराव जाधव यांनी रत्नागिरीच्या पन्हाळा किल्ल्यावर नोकरी स्वीकारली. यावेळी हा किल्ला पेशव्यांच्या ताब्यात होता. याच किल्ल्यावर पांडोबारावांचा मुलगा बळवंतराव (भाऊसाहेबांचे आजोबा) यांना नोकरी मिळाली. इंग्रज राजवटीमध्ये हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेल्यामुळे बळवंतरावांनी बाणकोटच्या रेसिडेन्सीमध्ये नोकरी केली. पुढे या रेसिडेन्सीचे रत्नागिरी आणि ठाणे असे दोन विभाग झाले. तेव्हा बळवंतरावांनी नोकरी सोडली आणि ते रत्नागिरी येथे आले. रत्नागिरीमध्ये स्वतःचे नवीन घर

बांधून राहू लागले. यासोबतच त्यांनी एक राममंदिरही बांधले. कालांतराने काही अज्ञात कारणास्तव हे बांधलेले घर जळाले असता भाऊसाहेबांचे वडील त्या जागी छोटेसे घर बांधून राहू लागले. त्यात आणखी दुरुस्ती करत भाऊसाहेबांनी ते वाढवले.

भाऊसाहेबांचे आजोबा जसे ब्रिटिशांकडे नोकरीस होते तसेच त्यांचे वडील विठोबाराव धामणस्कर हेसुद्धा नोकरीस होते. सुरुवातीस ते सुभा कचेरीत मराठी विभागात कारकून होते. त्यांची लेखनशैली उत्तम होती. याबाबतीत त्यांच्यासोबत असलेले त्यांचे भोर आडनावाचे मित्र म्हणतात की, “विठोबारावांची बुद्धी केवळ अलौकिक होती. पहिल्याने इंग्रजी येत नसेल परंतु युरोपियन लोक खास मराठी शिकवण्याचे काम करिता इंग्रजी भाषेत चांगले प्रवीण झाले.” ते मुळातच हुशार व स्वकर्तव्यदक्ष असल्यामुळे त्यांना हळूहळू बढती मिळत गेली. रत्नागिरीच्या अदालत कचेरीमध्ये शिरस्तेदार म्हणून बरीच वर्षे नोकरी करत असल्यापासून ते कडे (अहमदनगर) येथे न्यायाधीशांच्या नेमणुकीपर्यंत त्यांच्या कर्तृत्वाचा आलेख चढताच राहिला. शेवटी नाशिक येथे भाऊसाहेबांच्या वडिलांना सदर अमीनची कायमची जागा मिळाली. परंतु या ठिकाणी रुजू होण्याअगोदरच त्यांची प्रकृती बिघडली व त्यातच त्यांचे १८६० साली निधन झाले. विठोबारावांना दोन मुली व तीन मुले अशी पाच अपत्ये होती. त्यातील दोन मुले लहान वयातच मरण पावली व तिसरे मुल जे हयात होते ते म्हणजे रामचंद्र तथा भाऊसाहेब विठोबा धामणस्कर होय.

## बालपण

भाऊसाहेब म्हणून संबोधले जाणाऱ्या रामचंद्र विठोबा धामणस्कर यांचा जन्म १८४८ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यात भालावली (आजोळी) येथे झाला. त्यांचे संपूर्ण बालपण रत्नागिरीस गेले. ते ५ वर्षाचे झाल्यानंतर त्यांना शाळेत घातले. परंतु ते नियमितपणे शाळेत जात नसत. काहीतरी ढोंग करून ते शाळेमध्ये जाण्याचे टाळत असत. यासंदर्भातील एक गमतीदार गोष्ट नमूद करावीशी वाटते. बऱ्याच वेळा भाऊसाहेब सकाळी उठून शाळेत जाण्यापूर्वी, शाळेत जायला लागू नये म्हणून अंगात भूत संचारल्याचे ढोंग अशाप्रकारे करत की घरच्यांना ते खरे वाटे व त्यांचे शाळेत जाणे रद्द व्हायचे.

एके दिवशी तर त्यांच्या आई-वडिलांनी एका भूतवैद्याला बोलावून भाऊसाहेबांची अवस्था दाखवली. त्या भूतवैद्यालाही ते ढोंग खरे वाटून त्यांच्या अंगातले भूत काढून टाकण्यासाठी काही मंत्र-तंत्र केले. मंत्र-तंत्राने भूत जाईना म्हणून मिरचीची धुरी दिली परंतु तीसुद्धा भाऊसाहेबांनी मोठ्या निग्रहाने सहन केली. असा निग्रहीपणा व सहनशक्ती त्यांच्या अंगी लहानपणापासूनच असल्याचे आपणास पाहावयास मिळते. निग्रहीपणा आणि सहनशीलता हे दोन विशेष गुण लाभलेल्या धामणस्करांनी लहानपणी प्रयत्नपूर्वक रूक्ष वाटणाऱ्या गणित व इंग्रजी विषयांमध्ये प्रावीण्य मिळवले.

प्रत्येक थोर पुरुषांच्या आयुष्यात कधी-कधी असा एखादा प्रसंग येतो की, ज्यामुळे त्यांचे आयुष्य बदलून जाते. असाच एक प्रसंग भाऊसाहेबांच्या आयुष्यात आला ज्यामुळे ते नित्यनियमाने शाळेत जाऊ लागले. एकदा त्यांना त्यांच्या वडिलांनी एक नवी पाटी आणून दिली. त्यावर जांभळ्या रंगाचे डाग होते. ते पाहून त्यांना मजा वाटली. त्यांना ती इतकी आवडली की ती घेऊन ते तासनतास बसू लागले. त्यामुळे त्यांची उजळणी पाठ होऊन ते अंकगणितामध्ये प्रवीण झाले. भाऊसाहेब हुशार असल्यामुळे त्यांना कोणताही विषय एकदा समजून सांगितला की पक्का लक्षात राहात असे. त्यांची स्मरणशक्ती अप्रतिम होती. एकदा पाठ केलेले ते कधीही विसरत नसत.

इतिहास, भूगोल यासारखे विषय तर ते चुटकीसरशी पाठ करत. त्यांच्या स्मरणशक्तीमुळे शाळेत त्यांचे नाव 'एकपाट्या' असे पडले होते. त्यांच्या या स्मरणशक्तीविषयी येथे एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. एकदा रत्नागिरीस मॅट्रिक्युलेशनच्या वर्गात असताना भाऊसाहेबांनी अनेक संदर्भ पुस्तकांच्या आधारे 'आरोग्य' या विषयावर निबंध लिहिला होता. तो सगळा मुखोद्गत करून तिथल्या सभेमध्ये व्याख्यान रुपाने सादर केला. त्यांचे ते सादरीकरण आणि अस्खलित मराठी बोलणे अध्यक्षांना एवढे आवडले की त्यांनी त्यांच्या शिक्षकांजवळ भाऊसाहेबांचा 'रत्नागिरीचे डेमॉस्थेनीस' (अथेनियन राजकारणी वक्ते) असा गौरव केला.

धामणस्करांच्या वडिलांची पुण्यात नेमणूक झाल्यामुळे त्यांनी भाऊसाहेबास पुणे येथे शाळेत घातले. परंतु येथे ते जास्त दिवस थांबू शकले नाही. कारण त्यांच्या वडिलांची पुढे अहमदनगर येथे मुनसिफच्या जागी नेमणूक झाल्यामुळे त्यांना अहमदनगरच्या शाळेत जावे लागले. तेथील स्कूलबोर्डाकडून त्यांना सर्वच विषयातील विशेष प्रावीण्याचा दाखला मिळाला. हा दाखला त्या काळी खूप कमी मुलांस मिळत असे. यानंतर भाऊसाहेबांच्या वडिलांची नेमणूक कडे येथील मुनसिफच्या जागी झाल्यावर भाऊसाहेब परत रत्नागिरीस येऊन येथील इंग्रजी शाळेत जाऊ लागले. कडे येथे मुनसिफच्या पदावर नोकरी करत असताना भाऊसाहेबांचे वडील अचानक आजारी पडून त्यांचे निधन झाले.

त्यांच्या आकस्मिक निधनामुळे भाऊसाहेबांचे पुढील शिक्षण काही काळ थांबले. भाऊसाहेबांना लहानपणापासूनच मराठी पुस्तके वाचण्याचा छंद होता. सापडेल ते पुस्तक पूर्ण वाचल्याशिवाय ते खाली ठेवत नसत. अशी पुस्तके वाचत असताना त्यांच्या वाचनामध्ये विष्णुबुवा ब्रह्मचारी लिखित 'वेदोक्तधर्मप्रकाश' नावाचा ग्रंथ हाती आला. त्यांनी तो अगदी मन लावून आणि काळजीपूर्वक वाचला. या पुस्तकामुळे त्यांचे मन परिवर्तन होऊन परमार्थ साधना करावे असे त्यांनी ठरवले व ते त्या मार्गाला लागले. त्यावेळी भाऊसाहेबांचे वय अवघे १४ वर्षे होते. परमार्थ साधनेत त्यांनी त्या वेळेस ३ वर्षे घालवली. परंतु

हळूहळू यात काही तथ्य नाही असे त्यांच्या ध्यानात आल्यानंतर त्यांनी परमार्थ साधनेचा नाद सोडून दिला. या प्रकारामुळे त्यांच्या इंग्रजी भाषेच्या अभ्यासाला ३ वर्षांचा खंड पडला.

रत्नागिरीच्या शाळेत असताना भाऊसाहेबांच्या अंगी असलेल्या बाणेदारपणाचा प्रसंग येथे नमूद करावासा वाटतो. दरम्यान भाऊसाहेब रत्नागिरी येथील शाळेत असताना रसेल नावाचे एक शिक्षक त्यांना शिकवण्यास होते. त्यांना मुलांना शिकवण्यामध्ये अजिबात रस नव्हता. ते शिक्षक दारूही खूप पीत असत. त्यामुळे रत्नागिरी येथील 'जगन्मित्र' या वर्तमानपत्रांमध्ये त्यांच्या विरोधात वारंवार लेख लिहिले जात असत. हे लेख भाऊसाहेबच लिहितात असा रसेल सरांचा ग्रह झाला आणि ते एके दिवशी भाऊसाहेबांच्या अंगावर धावून गेले. तेव्हा भाऊसाहेब न डगमगता म्हणाले की, 'माझ्या अंगावर हात केलास तर मी ही उलट हात करीन.' कारण हे लेख भाऊसाहेब लिहितच नव्हते. भाऊसाहेबांनी कधीही पुढील आयुष्यात अन्याय सहन केला नाही व कोणावर अन्याय जुलूम होईल असे वर्तन केले नाही.

पुढे रसेल सरांचे विद्यार्थ्यांना शिकवण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे असे मुलांच्या लक्षात येऊन त्यातील काही समंजस मुलांनी पुण्याच्या इंग्रजी शाळेत जाण्याचा निर्णय घेतला. अर्थात या निर्णयाचे सूत्रधार भाऊसाहेब होते. पुण्याच्या इंग्रजी शाळेमध्ये जाण्यासाठी ज्या इतर मुलांनी निर्णय घेतला होता त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती चांगली होती. परंतु भाऊसाहेबांच्या घरची

परिस्थिती चांगली नसल्यामुळे त्यांच्यासमोर मोठी अडचण निर्माण झाली. आईला विचारावे तर आई आपणास जाऊ देणार नाही, शिवाय पुण्याच्या शिक्षणाचा खर्च भागविण्याची तिची ऐपतही नाही हे भाऊसाहेब जाणून होते. म्हणून त्यांनी विचार केला की, आईला न कळवता आपल्या आजीचे काही दागिने घेऊन बाकीच्या मुलांसोबत निघून जावे. असा पक्का निर्धार करून त्याप्रमाणे त्यांनी कृतीही केली.

## डॉ. भांडारकरांचा सहवास

पुढे भाऊसाहेबांच्या आईला हा सारा प्रकार कळताच भाऊसाहेबांना परत रत्नागिरीला आणण्याचा त्यांच्या आईने खूप प्रयत्न केला परंतु भाऊसाहेब यत्किंचितही आपल्या निर्धारापासून ढळले नाहीत. इकडे रत्नागिरीच्या शाळेतील बहुतांश मुले नाराज होऊन शाळा सोडून गेली. हे शाळा खात्याच्या अधिकाऱ्यास लक्षात येताच त्यांनी रसेल यांना त्या शाळेवरून काढून टाकले व त्यांच्या जागी डॉ. रामकृष्णपंत भांडारकर यांची नेमणूक केली. डॉ. भांडारकर हे खूप चांगले शिक्षक होते. त्यामुळे भाऊसाहेब व इतर बरीच मुले परत रत्नागिरीला येऊन पुन्हा त्या शाळेत जाऊ लागली. रत्नागिरीस परत आल्यानंतर भाऊसाहेबांनी आजीचे नेलेले दागिने आईच्या स्वाधीन केले. अशाप्रकारे भाऊसाहेबांनी रत्नागिरीच्या शाळेत पुन्हा प्रवेश घेऊन १८६६ मध्ये पहिल्याच प्रयत्नात मॅट्रिक्युलेशनची परीक्षा प्रथम क्रमांकाने पास झाले.

भाऊसाहेबांची शिक्षणाविषयीची आवड आणि त्यांची प्रखर बुद्धिमत्ता पाहून डॉ. भांडारकरांनी त्यांना पुढचे महाविद्यालयीन शिक्षण घेण्याचा सल्ला दिला. परंतु आपली घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्यामुळे आपण पुढील शिक्षण घेऊ शकत नाही असे भाऊसाहेबांनी डॉ. भांडारकरांना कळवले. अशा बुद्धिमान विद्यार्थ्यांचा अभ्यास त्यांच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे खुंटतो आहे याचे भांडारकरांना खूप वाईट वाटले. म्हणून त्यांनी भाऊसाहेबांस पुढील शिक्षणासाठी दरमहा २० रु. देण्याचे वचन दिले. परंतु ती रक्कम कुटुंब चालवण्यासाठी व पुण्यासारख्या ठिकाणी पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी अतिशय अल्प असल्यामुळे धामणस्करांनी शिक्षणाऐवजी नोकरीस प्राधान्य दिले. परिस्थिती गरिबीची असल्यानंतर हुशार मुलांच्या शिक्षणाची दैना कशी होते याचे भाऊसाहेबांना नेहमी वाईट वाटत असे. म्हणूनच आर्थिक विवंचनेमुळे आपल्या शिक्षणात आलेल्या अडचणींची जाणीव ठेवून धामणस्करांनी पुढे ते शिकत असलेल्या रत्नागिरीच्या शाळेतील गरीब मुलांना दरमहा ५० रुपये शिष्यवृत्ती सुरू केली.

## व्यावसायिक जीवनाचा आरंभ

मॅट्रिक्युलेशनपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी सरकारी शाळेत २० रु. पगारावर नोकरी स्वीकारली. एक वर्ष त्यांनी अतिशय सचोटीने आणि उत्कृष्ट प्रकारे नोकरी केल्यामुळे शाळा खात्याच्या अधिकाऱ्यांनी त्यांना दुसऱ्याच वर्षी २० रु. वाढीव

पगार देऊन तो ४० रु. केला व नंतर तिसऱ्या वर्षी तो ६० रु. करण्याचा प्रस्ताव मांडला. परंतु भाऊसाहेबांनी तिसऱ्या वर्षी रत्नागिरीच्या कलेक्टर कचेरीत कारकुनाच्या पदासाठी अर्ज केल्यानंतर त्यांना सेकंड क्लर्कची जागा मिळाल्यामुळे शिक्षकाची नोकरी सोडली. परंतु तेथे काम करत असलेल्या उच्च जातीय लोकांना भाऊसाहेबांना कारकुनाची नोकरी मिळाल्यामुळे खूप वाईट वाटले. कारण अशा सरकारी कचेऱ्यांमध्ये कारकुनी नोकऱ्या सुरूवातीपासूनच उच्च जातीय लोकानाच करत आलेली आहेत. त्यामुळे ही मंडळी भाऊसाहेबांचा खूप द्वेष, तिरस्कार करत असत. परंतु या द्वेषाला, त्रासाला न जुमानता भाऊसाहेब आपले काम निरलसपणे, वेळच्यावेळी व चोखपणे करत असत. परंतु त्यांनी कधीही इतरांचा द्वेष केला नाही व विनाकारण होणारा अन्यायही सहन केला नाही. त्यामुळे वरिष्ठांची त्यांच्यावर मर्जी असायची.

भाऊसाहेबांची कामावरची निष्ठा पाहून आर्थरसाहेबांना त्यांच्याबद्दल इतकी आपुलकी होती की, ते विलायतेस गेल्यावर तेथून त्यांनी भाऊसाहेबांस भेट म्हणून एक घड्याळ व कलमदान कर्नल जेकब यांच्याकडे पाठवून दिले. आर्थर साहेब एवढेच करून थांबले नाहीत तर त्यांनी त्यावेळचे साताऱ्याचे कमिशनर ऑलिफन्ट यांच्यापाशी 'साधेल तेवढी मोठी जागा देण्याविषयी' भाऊसाहेबांची शिफारस केली. भाऊसाहेबांनी मि. सामन (ॲक्टिंग कलेक्टर, रत्नागिरी), मि. एल्फिन्स्टन (दुसरे

ॲक्टिंग कलेक्टर, रत्नागिरी), मि. बॉस्वेल (कलेक्टर, रत्नागिरी), मि. आर्थर (कलेक्टर, सातारा), मि. ग्रांट (कलेक्टर, सातारा), मि. मूर (कलेक्टर, नाशिक), मि. स्टुअर्ट (कलेक्टर, नाशिक), इ. अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम केले.

धामणस्करांनी ज्यांच्या-ज्यांच्या हाताखाली काम केले त्यांनी भाऊसाहेबांची वरच्या पदावर नियुक्ती व्हावी म्हणून वरिष्ठांकडे शिफारशी केल्या. यासंदर्भात मि. ग्रांट यांचा एक अभिप्राय महत्त्वाचा आहे. ते म्हणतात, 'मिस्टर रा. वि. धामणस्कर यांची योग्यता अत्यंत मोठी आहे असे मी समजतो. तो आपले काम उत्कृष्ट प्रकारे करतो. याच्या इतका परिश्रम घेऊन आपले काम मनःपूर्वक व उत्साहपूर्वक करणारा मनुष्य मला आजपर्यंत कोणी आढळला नाही. याचे इंग्रजी भाषेचे ज्ञान तर फारच चांगले आहे हेड अकाउंटंटची जागा खाली झाल्यास त्या जागेला हा अत्यंत लायक आहे.' येथे आवर्जून एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, भाऊसाहेबांचे प्रत्येक कलेक्टरांपाशी पराकाष्ठाचे वजन होते परंतु त्याचा त्यांनी कधीही दुरुपयोग केला नाही.

## ब्रिटिश प्रशासनात मामलेदार

धामणस्कारांच्या कठोर मेहनतीतून ते १८८० साली वयाच्या अवघ्या ३१ व्या वर्षी नानगाव तालुक्याचे मामलेदार झाले. भाऊसाहेब हे ब्रिटिश काळातले पहिलेच आणि बहुधा शेवटचे मराठा मामलेदार असावेत. उच्च जातीय लोकांच्या कटकटीमुळे त्यांना मामलेदाराची नोकरी करण्यात अजिबात रस नव्हता.

त्यामुळे त्यांनी १८७८ मध्ये मुंबईत एका परीक्षेसाठी आले असता बडोद्यास जाऊन काजी शहाबुद्दीन साहेबांस भेटले आणि आपली बडोद्यास काही नोकरीची सोय होते का ते विचारले. त्यावेळेस काजी शहाबुद्दीन साहेब हे बडोद्यास सरसुभे होते व टी. माधवराव हे दिवाण होते. त्यावेळेस दिवाणांनी त्यांना २५० रु. पगाराची नोकरी देऊ केली परंतु पगार कमी वाटत असल्यामुळे त्यांनी ती स्वीकारली नाही. त्यावेळेस काजी साहेबांनी भाऊसाहेबांना अभिवचन दिले की विलायतेस जातो आहे तेथून परत आलो की तुमच्यासाठी प्रयत्न करतो. दरम्यान भाऊसाहेबांना बढती मिळून १८८४ साली भुसावळ येथे बदली झाली. परंतु या पदावर त्यांनी अवघे ३ महिनेच काम केले.

## धामणस्कारांचे बडोद्यात आगमन

१८८४ मध्ये सयाजीराव महाराजांनी स्वतः काजी शहाबुद्दीन यांना विचारणा केली की, 'ब्रिटिश अंमलामध्ये कोणी हुशार मामलेदार असल्यास पाहा, आपण त्याला चांगला पगार देऊन ठेवू.' त्यावेळी भाऊसाहेबांचे गुरू आणि मित्र अण्णा भिवराव तसेच त्यांचे स्नेही मामा परमानंद यांनी भाऊसाहेबांचे नाव सुचवले. तेव्हा शहाबुद्दीन यांना धामणस्करांची आठवण झाली व त्यांनी भाऊसाहेबांची शिफारस केली. त्यानंतर भाऊसाहेबांना १८८४ मध्ये बडोदे सरकारातून बोलावणे आले व सयाजीराव महाराजांनी त्यांची मुलाखत घेऊन दरमहा ४५० रु. पगार देऊन बडोद्यामध्ये नोकरीत रुजू केले.

बडोदा संस्थानात प्रथमतः १८८४ मध्ये भाऊसाहेबांची नियुक्ती असिस्टंट सरसुभे या पदावर झाली. १८८६ मध्ये त्यांना अमरेली प्रांताचे सुभेदार नेमले परंतु तेथेही ते फार काळ राहिले नाही. अवघे १० महिने अमरेली प्रांतात काम केले. महाराजांचा ३१ मे १८८७ ते २० फेब्रुवारी १८८८ असा ८ महिने २० दिवसांचा पहिला परदेश प्रवास होता. यावेळी महाराज इंग्लंड दौऱ्यावर गेले होते. या प्रवासावेळी मुख्याधिकारी म्हणून रामचंद्र धामणस्कर यांची महाराजांनी निवड केली होती. या प्रवासाला कुटुंबातील आणि संस्थानातील लोकांचा विरोध होता. कारण समुद्र प्रवास हा त्या काळात हिंदू धार्मिक मान्यतेच्या विरुद्ध होता. त्यामुळे महाराजांच्या सेवेतील अधिकारी, कर्मचारीही महाराजांबरोबर जाण्यासाठी टाळाटाळ करत होते. अशा पार्श्वभूमीवर या दौऱ्याचे मुख्याधिकारी म्हणून धामणस्कर यांनी बजावलेल्या उत्तम कामगिरीवर खुश होऊन महाराजांनी त्यांना १५० रु. मासिक पगारवाढ दिली. यावरून धामणस्करांच्या कार्यपद्धतीचा अंदाज येतो.

भाऊसाहेब १८८८ ला विलायतेतून परत आल्यावर काही दिवस भाटवडेकर यांच्या जागी सेटलमेंट ऑफीसर म्हणून नेमले. नंतर त्यांना त्यांच्या स्वतःच्या विनंतीवरून नवसारी प्रांताचे सुभे म्हणून नेमले. नवसारी प्रांताचे सुभे म्हणून काही दिवस काम केल्यानंतर त्यांची नियुक्ती कडी प्रांताचे सुभे म्हणून झाली. हे काम काही दिवस केल्यानंतर इ. स. १८९१ मध्ये त्यांची तपासणी

कामदार म्हणून नेमणूक करून बडोदे संस्थानातील बहुतेक खात्याची तपासणी त्यांच्याकडून करून घेतली. त्या दरम्यान बडोदे संस्थानातील एकंदर मुलखी खाती, सरकारी स्पिनिंग अँड विविंग मिल, खाजगी खात्यासंबंधीचे हुजूर हुकूम, एकंदर कचेऱ्या आणि खर्च वेच, जवाहीरखाना इ. खाते बारकाईने तपासून त्याचे रिपोर्ट भाऊसाहेबांनी तयार करून महाराजा सयाजीरावांना सादर केले व त्यात त्यांनी सुधारणा सुचवल्या. तपासणीचे काम करण्यात भाऊसाहेबांनी दर्शवलेली स्वकर्तव्य, निपुणता, हुशारी, धोरण व प्रामाणिकपणा ही केवळ वर्णनीय आहेत.

## दुष्काळ निवारण अधिकारी

१८९९ साली जून, जुलै, ऑगस्ट पावसाविना कोरडे गेले. दुष्काळाची चाहूल ओळखून सयाजीरावांनी चारही प्रांतात दुष्काळ निवारणार्थ उपाययोजना करण्यासाठी महात्मा फुले यांचे कार्यकर्ते रामचंद्र धामणस्कर यांना दुष्काळ निवारण अधिकारी FAMINE COMMISSIONER नेमले. धामणस्करांनी दुष्काळी भागाची पाहणी करून महाराजांना अहवाल दाखल केला.

दुष्काळाचे स्वरूप भीषण होते. पावसाळ्याचे पाच महिने उलटून गेल्याने रानातले गवत वाळून गेले. गुरेढोरे चारापाण्याविना मरू लागली. शेतीवर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांची उपासमार सुरू झाली. गुरे आणि माणसे मरू लागली. सयाजीरावांनी स्वतः

कडी, अमरेली, बडोदा आणि नवसारीचा दौरा केला. शेतकी खात्याचे प्रमुख खासेराव जाधव, दुष्काळ निवारण अधिकारी धामणस्करांसोबत होते. बैलगाड़ी आणि घोड्यावर दौरा केला. या दुष्काळादरम्यान धामणस्करांनी दुष्काळ अधिकारी म्हणून बजावलेली भूमिका त्यांच्यातील तळमळीच्या सत्यशोधक कार्यकर्त्यांची चुणूक दाखविणारी होती.

## फुले-सयाजीराव भेटीचे माध्यम

१८८२ मध्ये धामणस्करांनी पुण्यात महाराजा सयाजीराव आणि महात्मा फुले यांची भेट घडवून आणली. १८८३ मध्ये धामणस्करांच्या मध्यस्थीने फुलेंनी बडोद्याला भेट दिली. बडोदावत्सलचे संपादक रामजी संतूजी आवटे आणि धामणस्कर यांनी १८९६ मध्ये बडोद्यात मराठा जातीचे पुरोहित तयार करण्यासाठी माधवराव पवार यांच्या घरी पुरोहित पाठशाला सुरू केली. पुढे २३ वर्षांनी याच धर्तीवर १९१९ मध्ये कोल्हापूर येथे श्री शिवाजी वैदिक स्कूलची स्थापना सत्यशोधक भास्करराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली केली. १९१० मध्ये बडोदा येथे भरलेल्या चौथ्या मराठा शिक्षण परिषदेच्या अधिवेशनात धामणस्करांच्या पत्नी जानकीबाई यांनी धामणस्करांच्या मृत्युपत्रातील इच्छेनुसार ७५ हजार रु.ची (आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम अंदाजे १५ कोटी रुपये इतकी भरते) जंगम मालमत्ता मराठा विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी दान केली.

## धामणस्कर – केळूसकर बंध

सयाजीरावांनी जेव्हा इंग्रजीतील राष्ट्रकथामालेचे काम हाती घेतले होते, त्यावेळी धामणस्कारांच्या शिफारशीवरूनच महाराजांनी कृष्णराव अर्जुन केळूसकर यांना या मालेतील 'फ्रान्सचा जुना इतिहास' या ग्रंथाच्या मराठी अनुवादाचे काम दिले. त्यामुळेच केळुसकरांनी आपल्या आत्मचरित्रात त्यांच्या ग्रंथलेखन व्यवसायातील प्रवेशाचे श्रेय धामणस्करांना दिले आहे. फ्रान्सचा जुना इतिहास हा ग्रंथ १८९३ मध्ये प्रकाशित झाला होता. महाराजांनी पुढे केळुस्कारांना सात उपनिषदांचे भाषांतर करण्याची संधी दिली. हे काम केळूसकरांनी १८९९ ला पूर्ण केले. असे काम करणारे केळुसकर हे पहिले ब्राहमणेतर आहेत. पुढे केळुसकरांनी मराठीतील पहिली ठरलेली गौतम बुद्ध, तुकाराम महाराज, शिवाजी महाराज यांची चरित्रे लिहिली. याच केळुसकरांनी पुढे बाबासाहेबांना सयाजीरावांकडून शिष्यवृत्ती मिळून दिली. यामुळे धामणस्करांप्रती केळुसकरांची असणारी कृतज्ञता व्यक्त करणारे एक उदाहरण म्हणजे १९०१ मध्ये धामणस्कर बडोदा संस्थानचे दिवाण झाल्यानंतर केळुसकरांनी १९०२ मध्ये धामणस्करांचे छोटे चरित्र लिहिले.

## बडोदा प्रशासनातील विविध जबाबदाऱ्या

१८९३ साली धामणस्करांची नायब दिवाणपदी नियुक्ती झाली. या पदावर त्यांनी दोन-तीन वर्षे काम केले. त्या हुद्द्यावर असता त्यांना फौज खात्याची तपासणी करावी लागली. पुढे

काही दिवस ते जॉईंट सरसुभे झाले त्यावेळेस आंग्रे साहेब १३ महिने दिवाणाचे काम पाहत होते. तेव्हा त्यांच्या जागी भाऊसाहेबांनी सरसुभे म्हणून काम पाहिले. तेथून पुन्हा ते कडी प्रांताचे सुभे म्हणून काम पाहत होते. हे काम त्यांनी मार्च १८९८ पर्यंत केले आणि आंग्रे साहेब वारल्यामुळे त्यांना सरसुभेची जागा कायमची मिळाली. या सुमारास कडी प्रांतात पिलवाई प्रकरण घडून आले परंतु त्यांनी अत्यंत हुशारीने कसलीही मनुष्य हानी न होऊ देता ते मिटवले व बंडखोरांनाही योग्य ते शासन केले. तसेच कडी प्रांतातील विजापूर तालुक्यातील फर्ता आकडा गावात वसूल ठाकूर लोक मोजणी कामात अडथळा आणत होते. तेथील ठाकूर व बंडखोर रजपूत सरकारच्या विरुद्ध बंड करून सरकारी फौजेचा मोड करून विसनगर, विजयपूर इ. नगरे काबीज करायची व त्यांच्यातीलच एका इसमाला राजा करून दुसऱ्या एकाला प्रधान करायचे. परंतु भाऊसाहेबांनी महाराजांकडून प्रसंगी बंडखोरावर हल्ला चढवण्यासाठी सर्व ते अधिकार मिळवून घेतले आणि अत्यंत शिताफीने ठाकूर व रजपुतांचे बंड मोडून काढले तद्नंतर बंडखोरांना कडक शासन केले. या कामाबद्दल भाऊसाहेबांना महाराजांकडून चांगली शाबासकी मिळाली.

## बडोद्याचे दिवाण : रामचंद्र विठोबा धामणस्कर

सरसुभेच्या हुद्याचे काम भाऊसाहेबांनी तीन वर्षे केले एवढ्या अवकाशात त्यांना एकदा दिवाण पदावर काम करण्याची संधी मिळाली. पुढे दिवाण बहादुर श्रीनिवास राघव अंयगार हे

कायमचे दिवाण पद सोडून गेल्यावर भाऊसाहेबांना ऑक्टोबर १९०१ ला दिवाण पद मिळाले. भाऊसाहेबांना दिवाण पद मिळाल्यामुळे संस्थानातील व संस्थानाबाहेरील इतर समंजस व्यक्तींना ही नेमणूक योग्यच वाटली परंतु काही उच्च जातीय लोकांना केवळ जातीमत्सरास्तव किंवा खाजगी द्वेषभावास्तव वाईट वाटले. अशाप्रकारे भाऊसाहेब तथा रामचंद्र विठोबा धामणस्कर आपल्या मेहनतीच्या, इमानदारीच्या, शिस्तीच्या, जोरावर रत्नागिरीच्या कचेरीतील कारकून, हेड क्लार्क, मामलेदार ते बडोदा संस्थानचे ७ वे दिवाण बनले. त्यांच्या या प्रवासामध्ये कधीही कामासंबंधाने वरिष्ठांकडून किंवा खुद्द महाराज सरकारांकडून यत्किंचितही ठपका किंवा दोष आढळून आला नाही. बडोदा संस्थानातील विविध प्रकारची बिकट व नाजूक कामे प्रामाणिकपणाने, दक्षतेने व तेवढ्याच संवेदनशीलतेने करून स्वामीकार्यनिष्ठा भाऊसाहेबांनी वेळोवेळी दाखवून दिली. म्हणूनच सयाजीराव महाराजांनी आपल्या राज्याचे सर्वोच दिवाणपद भाऊसाहेबांच्या हाती सोपवून एका सत्यशोधकाला खऱ्या अर्थाने न्याय दिला. अशा या महान सत्यशोधकाचा मृत्यू बडोदा संस्थानातील नवसारी येथे जून १९०६ मध्ये झाला.

सयाजीरावांनी आपल्या प्रशासनात सर्व जाती धर्माच्या लोकांचा समावेश जाणीवपूर्वक केला होता. कामातील तत्परता, प्रामाणिकपणा आणि महाराजांची ध्येय-धोरणे सामान्य लोकांपर्यंत घेऊन जाण्याची ताकद असणे हेच निकष

महाराज लोक निवडताना लावत असत. महाराजांच्या एकूण कारकीर्दीवर नजर टाकली असता ज्ञानी आणि सक्षम लोकांची फौज कायम आपल्या हाताशी ठेवली होती असे दिसते. एकूण विचार करता परंपरावादी आणि संकुचित दृष्टीचे एकारलेले लोक एकतर महाराजांनी निवडले नाहीत आणि चुकून निवडलेच तर ते महाराजांकडे टिकले नाहीत. या पार्श्वभूमीवर धामणस्कर १८८४ ते १९०६ मध्ये मृत्यूपर्यंत २२ वर्षे आपल्या गुणवत्तेवर महाराजांच्या सेवेत टिकून राहिले.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूस्कर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
 - धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
 - धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
 - सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
 - दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
 - डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
 - सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
 - पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
 - बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव ‘प्रजासत्ताक’
 राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि
 सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
 - बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि
 शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि
 जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com